# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## प्रेसनोट

### स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात नवीन आदिवासी वस्त्यांना मुलभूत सोई सुविधा पुरविणेसाठी महानगरपालिकेच्या विशेष धोरण राबविण्याचा संकल्प

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध भागात आदिवासी वस्त्या असून सदर ह्या प्रामुख्याने संजय गांधी राष्ट्रीय उदयानाच्या पायथ्यालगतच्या क्षेत्रात वसलेल्या आहेत. सदर आदिवासी वस्त्या हया चेणा, पाटीलपाड, बेलकरीपाडा, काजूपाडा, वर्सोवा, माशाचापाडा, दासगुलपाडा, जयहिंदनगर, केळीचापाडा, केसरीपाडा, वाघोबा एकता चाळ, बाबळीचा भाट क्र.1 व 2, मिनाक्षीनगर त्याचप्रमाणे उत्तन मासळी पाडा, चवळीपाडा, उत्तन वेलकंनी चर्च, उत्तन मोठा गांव, मातडोंगरी, धावगी चौक, इंदीरानगर, मुर्धाखाडी पाडा, जाभंळी आगर, चौक डोंगरी ठिकाणी आहेत.

सदर वस्त्याकडे जाणारे रस्ते, पायवाटा, शौचालये, समाजमंदीरे, स्मशानभूमी, दिवाबत्ती, आरोग्य केंद्रे, जलवाहीनी, विहीरी इ. सोईसुविधा पुरविणेसाठी महानगरपालिकेने पहाणी करुन प्रस्ताव तयार केला असून खालीलप्रमाणे नियोजन करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

1) वन विभागाच्या जागेवरील रस्ते, स्मशानभूमी इ. सुविधा निर्माण करण्यासाठी वन हक्क समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आले असून सदर परवानगी घेऊन सदर कामे करणे.
2) विकास योजनेत ज्या ठिकाणी रस्ते, स्मशानभूमी व इतर सुविधा दर्शविल्या नाहीत त्या सुविधा निर्माण करण्यासाठी विकास योजनेत आरक्षण दर्शविणे.
3) विकास योजनेतील रस्ते, स्मशानभूमी व इतर सुविधासाठी खाजगी जागा संपादन करणे.
4) शासकिय जागेवर विविध सुविधा पुरविणे कामी शासनाकडे जागेची मागणी करणे.
5) महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात सदर कामे करण्यासाठी विशेष तरतूद करुन सदर सुविधा पुरविणे.

6) सध्यस्थितीत ज्या सुविधा त्वरीत पुरविण्यासाठी जागेची अथवा इतर कोणतीही अडचण नाही अशा सुविधा तातडीने पुरविणे.

7) आदिवासी वस्त्यामधील विहीरीची दुरुस्ती करुन तसेच पाण्याचे स्तोत्र साफ करुन सदर पाण्याचा पुर्नवापर करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात आदिवासी वस्त्यांना मुलभूत सोई सुविधा पुरविणे योजनेसाठी प्रशासकीय ठरावाव्दारे निर्णय घेऊन वरीलप्रमाणे नियोजन करुन कामास सुरवात केली आहे.

PC-2/2023-24/DK/y-11

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका